# सामाजिक कार्यकर्त्या डॉ. ब्रह्मे यांचे निधन



पुणे, ता. १ : सामाजिक चळवळीतून न्याय आणि समानतेसाठी झटणाऱ्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, 'लोकायत'च्या संस्थापक आणि अर्थतज्ज्ञ डॉ. सुलभा ब्रह्मे (वय ८४) यांचे वृद्धापकाळामुळे गुरुवारी पुण्यात निधन झाले.

लोकांचे प्रश्न सातत्याने मांडणाऱ्या सुलभाताईंनी 'नोटाबंदीमुळे जनतेवर होणारे परिणाम' या विषयावर आठवडाभरापूर्वीच सविस्तर लेख लिहिला होता. शिवाय पुरंदरला भेट देऊन विमानतळविरोधी शेतकरी आणि स्थानिकांच्या संघर्षालाही पाठिंबा दिला होता. अखेरपर्यंत त्या कार्यरत होत्या; पण आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे त्यांचे बंधू व पर्यावरणाचे अभ्यासक माधव गाडगीळ आणि पुरुषोत्तम गाडगीळ असा परिवार आहे.

सुलभाताईंनी अर्थशास्त्र विषयातील एमए, पीएच.डी. केल्यानंतर १९५९ पासून गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये १९९२ पर्यंत संशोधकपदी काम केले. त्यांचे वडील बॅ. धनंजयराव गाडगीळ यांनीच ही संस्था १९३० मध्ये स्थापन केली होती. त्यांचा उद्देश सुलभाताईंनी आपल्या कामातून दाखवून दिला. गोखले अर्थशास्त्र संस्था आणि समविचारी सहकारी यांनी एकत्र येऊन 'समाजविज्ञान ग्रंथालया'चीही स्थापना केली.

'पानशेत धरण फुटल्यानंतर' या विषयावर त्यांनी पुस्तक लिहिले. १९७२ च्या दुष्काळातील समस्यांचा वेधही त्यांनी पुस्तकातून घेतला. लोकायत व्यासपीठ स्थापन केले. पुरोगामी महिला संघटना, बायजा ट्रस्ट, स्त्रीमुक्ती चळवळीचा त्या आधार होत्या. अण्वस्त्रविरोधी आणि शांतता चळवळ, एन्रॉन, जैतापूरसारख्या आंदोलनात विश्लेषक आणि कार्यकर्त्याची त्यांची महत्त्वाची भूमिका होती. 'प्लॅनिंग फॉर द मिलियन्स', 'प्रोड्युसर्स को-ऑपरेटिव्हज एक्सपिरियन्स अँड लेसन्स फ्रॉम इंडिया', 'विमेन वर्कर्स इन इंडिया : स्टडीज इन एम्प्लॉयमेंट अँड स्टेटस', 'ड्रॉट्स इन महाराष्ट्र', '१९७२ : द केस ऑफ इरिगेशन प्लॅनिंग' अशी विविध पुस्तके लिहिली.

## श्रद्धांजली सभा रविवारी

**डॉ. ब्रह्मे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी डाव्या-पुरोगामी संघटनांतर्फे सभा आयोजिली आहे. ती सिंहगड रस्त्यावरील राष्ट्र सेवा दलाच्या सभागृहात रविवारी सायंकाळी पाच वाजता होणार आहे.**